I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** कुरुंदा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0385 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/10/2023 02:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 26/10/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/10/2023
**Time From (वेळेपासून):** 17:22 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/10/2023 **Time (वेळ):** 02:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/10/2023 02:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** अप्पा चाय वाले हटेलसमोर रोडवर,शिरडशहापुर , शिरडशहापुर ,औंढा ना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बालाजी नारायणराव वानखेडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पुर, ता औंढा ना ,औंढा ना,कळमनुरी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पुर, ता औंढा ना ,औंढा ना,कळमनुरी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9881855455

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक सूर्यकांत शंकरराव खाडे | | | 1. वैष्णवी नगर खटकाळी बायपास ,हिंगोली,हिंगोली ग्रामीण , हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 1,05,000 / रुपये(500 रुपये दराच्या 210 चलनी नोटा) | 105,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

105,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

ला.प्र.वि.

हिंगोली दि.26/10/2023

फिर्याद

मी, बालाजी नारायणराव वानखेडे, वय 39 वर्ष, व्यवसाय गुत्तेदारी, रा. पुर, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली मो.क. 9881855455

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे फिर्याद देतो की, मी दिनांक 26/10/2023 रोजी 12.30 वाजता सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे पोलीस निरीक्षक, श्री प्रफुल्ल अंकुशकर यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत मौजे पुर, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली येथे गावाअंतर्गत नळ योजनेचे कामपुर्ण करून पुढील देखभाल दुरूस्तीसाठी ग्राम पंचायत पुर, ता. औंढा नागनाथ यांना हस्तांतरण करून हस्तांतरण प्रमाणपत्र देण्यासाठी व नविन नळ पाणी पुरवठा योजना अंतर्गत वैयक्तीक घरगुती नळ जोडणी करण्याचे कामाचा कार्यरंभ आदेश देण्यासाठी ग्रामपंचायत पुर ता. औंढा नागनाथ येथील ग्रामसेवक सूर्यकांत खाडे यांनी 1,15,000/- रू लाचेची मागणी करीत असुन यांचे विरूध्द कायदेशिर कारवाई करावी अशी लेखी तक्रार दिली होती.

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथील पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी दोन पंच नामे श्री अंकुश रामराव तमखाने, निमतानदार, भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली व श्री जावेद रमजान बेनिवाले, शिपाई, भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली यांना कार्यालयात बोलावुन घेवुन त्यांचा परीचय करून देवुन मी दिलेली लेखी तकार त्यांना दाखविण्यात आली होती.

त्यानंतर आज दिनांक 26/10/2023 रोजी करण्यात आलेल्या तकार पडताळणी कार्यवाही दरम्यान मी पंच क. 1 श्री तमखाने यांचेसह ग्रामसेवक सूर्यकांत खाडे, यांची भेट घेण्या करीता पंचायत समिती औंढा ना येथे गेलो असता ग्रामसेवक सुर्यकांत खाडे यांची भेट झाली त्यानंतर तेथुन औंढा ना. ते वसमत रोडवरील रेणुकामाता रसवंती येथे गेलो असता तेथे माझे कामासंबंधी बोलणी करीत असतांना ग्रामसेवक सुर्यकांत खाडे यांनी हस्तांतरण प्रमाणपत्र देण्यासाठी व नविन नळ पाणी पुरवठा योजना अंतर्गत वैयक्तीक घरगुती नळ जोडणी करण्याचे कामाचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी 1,15,000 /- रूपयाची मागणी करून तडजोडी अंती 1,05,000/- ची मागणी करून 1,05,000/- रू लाच रक्कम स्वीकारण्याची सहमती दर्शवीली आहे.

त्यावरून आज दिनांक 26/10/2023 रोजी औंढा नागनाथ ते पिंपळदरी रोडवर शासकिय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 1,05,000/- रू. (500/- रू. दराचे 210 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी अँन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक शेख अकबर यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने ॲन्थ्रॉसीन पावडर लावली. त्यानंतर लाच स्विकारल्या नंतर करावयाचा ईशाऱ्या बाबत पोलीस निरीक्षक, श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी मला, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना दिल्या

त्यानंतर आज दिनांक 26/10/2023 चे 17.22 वा. दरम्यान मी, पंच व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे ग्रामसेवक सुर्यकांत खाडे यांना भेटण्यासाठी शिरडशहापुर गावाकडे रवाना झालो. तेव्हा माझी ग्रामसेवक सूर्यकांत खाडे यांची शिरडशहापुर ते वसमत रोडवरील आप्पा चाय वाले या हॉटेलवर भेट झाली. तेव्हा ग्रामसेवक सुर्यकांत खाडे यांनी लाचेची रक्कम 1,05,000/- रू. त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचेजवळील

रूमालमध्ये गुडांळुन स्वतःच्या हातमध्ये ठेवली. त्यावरून मी सापळा पथकास ठरल्याप्रमाणे लाच स्विकाल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने ग्रामसेवक सुर्यकांत खाडे यांना 17.22 वा. सुमारास शिरडशहापुर येथील आप्पा चाय वाले या हॉटेल समोर त्यांना ताब्यात घेवुन त्याचेकडून लाचेची रक्कम 1,05,000/- रू. पंचासमक्ष जप्त केली.

तसेच पडताळाणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व ग्रामसेवक सुर्यकांत खाडे यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी लोकसेवक सूर्यकांत शंकरराव खाडे, ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय पुर ता. औंढा नागनाथ जि. हिंगोली यांनी त्याचे पदाचा दुरूपयोग करून त्यांना मिळणारे परिश्रमिका खेरीज 1,15,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडी अंती 1,05,000/- रू लाचेची रक्कम स्वतः स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 26/10/2023रोजी पोलीस निरीक्षक, श्री प्रफुल्ल अंकुशकर यांना तोंडी सांगितली असून ती संगणकावर टंकलिखित केली असून माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष फिर्याद दिली सही

(प्रफुल्ल अंकुशकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

बालाजी नारायणराव वानखेडे
रा. पुर ता. औंढा नागनाथ जि. हिंगोली
मो.नं. 9881855455

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
PRAFULL HANUMANTRAO ANKUSHKAR
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): PI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Gajanan Kaloba Mor
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.कुरुंदा